# प्रकरण चौथे

# दादासाहेब मोरे यांच्या 'गबाळ' मधील वेदना व विद्रोहाचे स्वरुप

# प्रकरण ४ थे

## दादासाहेब मोरे यांच्या 'गबाळ' मधील 'वेदना' व 'विद्रोहाचे' स्वरुप.

प्रत्येक कालखंडाची एक विशिष्ट संवेदनशीलता असते. त्या त्या कालखंडाच्या संवेदनेला त्या त्या कालखं डातील साहित्य गोचर करीत असते. 'स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संवेदना केंद्रच हालले आहे. भावनांचे आधिष्ठान बदलले की, बदललेल्या भावनांचे अधिष्ठान व्यक्त करणारे साहित्याचे नवे रुप अस्तित्वात येते. हे अस्तित्वात आलेले रूप म्हणजे साद आणि पडसाद असतात.'[१] दलित साहित्याच्या बाबतीत देखील हेच म्हणता येईल. याच जाणिवेतून आपली वेदना, विद्रोह, नकार दलित लेखक व्यक्त करतो आहे. तो केवळ अन्यायाच्या छळांच्या घटनांनी भरलेल्या भूतकाळातील चित्रण करीत नाही. तर त्याला वर्तमान काळातील आव्हाने स्वीकारायची आहेत. व आपले भविष्य घडवायचे आहे. म्हणून त्यांनी स्वीकारलेल्या निष्ठा, मूल्यविचार अतिशय वेगळा आहे. दलित साहित्याची चळवळ ही सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आहे. या चळवळीला वर्णव्यवस्था नको आहे. मनुष्यत्वाची प्रतिष्ठापना त्यांना हवी आहे. दलित म्हणजे शोषित, श्रमजीवी असे म्हटले जाते हे फारसे योग्य नाही. कारण ही चळवळ म्हणजे वर्गलढ्याची चळवळ नव्हे तर मनुष्याच्या गुलामगिरीच्या मुक्तीची चळवळ आहे. बौध्द, नवबौध्द, महार, चांभार, भटक्या जमाती, आदिवासी, गुन्हेगार जमाती इ. विविध समुह म्हणजे सामाजिक अन्याय, दारिद्रय इ. ग्रस्त असा दलित वर्ग यांची चळवळ असून या वर्गाला दुष्ट रानटी परंपरा, अंधश्रध्दा, भोळेपणा, गुलामगिरी याविरुध्द बंडाला, लढ्याला उद्युक्त करणारी ही चळवळ असून या चळवळीतून दलित जीवनाचे दर्शन घडविते. ते दलित साहित्य असून ते सर्वांसाठी आहे याच जाणिवेतून 'बलूतं', 'आठवणीचे पक्षी', 'उचल्या', 'उपरा', 'अक्करमाशी', 'गबाळं' या आत्मकथनांचा जन्म झाला आहे.

'गबाळ' या दादासाहेब मोरे यांच्या आत्मकथनातून कुडमुडे जोशी या भटक्या जमातीच्या व्यथा समाजासमोर मांडल्या आहेत. आपले बिऱ्हाड घोड्यावर लादून गावोगाव जाणारे अज्ञान, दारिद्रय, अनारोग्य, व्यसनाधिनता इ. चक्रात सापडलेले औद्योगिकीकरण, कायदा व सुव्यवस्था, शिक्षण, नागरी जीवन इ. पासून जाणिवपूर्वक लांब राहणाऱ्या समाजाच्या व्यथा वेदना येथे चित्रित केल्या आहेत. उज्वल भविष्याच्या जडणघडणीत प्रस्थापिताशी विद्रोही भावनाही व्यक्त झाली आहे. अर्थात 'गबाळा'त ही भावना सौम्य रूप धारण करुन अवतरते आहे. आपल्या समाजाच्या जीवनपध्दतीत समाजाची होत असलेली अधोगती आणि मनुष्यत्वाची, मनुष्याची होणारी हेळसांड, व त्याच्या वेदनेला यात शब्दबध्द केले आहे.

**वेदना :** या आत्मकथनातून कुडमुडे जोशी समाजाची वेदना साकार झाली आहे. वर्षानुवर्ष आठ - दहा कुटुंबाच्या संख्येने हा समाज भ्रमती करतो. पाणी आणि मोठी लोकसंख्या पाहून हागणदारीत पाले मांडली जातात. या समाजाचा भविष्य सांगण्याचा व्यवसाय असला तरी स्वत:च्या भविष्याची त्यांना कुठेही काळजी नाही. म्हणून लेखक म्हणताता, 'त्या पाच एकरामध्ये जत्रा भरल्यासारखी वाटायची फक्त दु:ख आणि लाचारी यांची देवघेवच त्या जत्रेत चालत होती. तरीपण या पालांच्या जगात मी मोठा आहे हे दाखवण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करत होता. पालासमोर घोडं बांधलेलं असायचं, दोन-चार कुत्री भॉं - भॉं करीत भुंकायची. घोड्याच्या पाठीवर यांचा संसार असतो आणि घोड्यावरुनच यांची भ्रमती सुरु असते. कोणाजवळ तरी एखादा रेडीओ असायचा आणि आहे नाही तेवढा आवाज सोडून पालाच्या पुढच्या मेढीला अडकवून दोन्ही पाय पसरुन बसायच. पालातील लोकांना तो प्रतिष्ठित वाटत असे. कोणी एखादा जुन्या बाजारातील घेतलेला शर्ट अडकावयाचा आणि चिमुकल्या जगातून मिरवायचा. रात्री दिवे लागले की चहुकडे शांतता. फक्त कुत्र्याचं भुंकणं तेवढंच ऐकू यायचं. सर्वजण आपली दु:ख, व्यथा विसरुन उद्या मला चार भाकरीचे तुकडे कोठे मिळतील ? पहाटे कोणत्या गावाला जावे ? वाट चांगली आहे किंवा नाही ? अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांच्या वावटळीत अडकायचा आणि झोपी जायचा, केव्हा झोप लागायची हे त्याला समजायचे नाही.'[२]

आपल्या समाजाच्या अवस्थेला सवर्ण समाज कारणीभूत आहे कारण आमची माणूसकी लेखणीचा हक्क त्यांनी नाकारला, आमचे मनुष्यत्वच त्यांना अमान्य आहे. आम्हाला जनावराप्रमाणे वागविण्यात त्यांना आनंद वाटतो. त्यात धन्यता वाटते. याविषयीचे वर्णन करताना लेखकाने सलगरे गावातील प्राथमिक शाळेतील प्रसंग वर्णन केलेला आहे. लेखक जेव्हा या गावातील शाळेत गेले तेव्हा गरीबीमुळे अंगावर फाटके कपडे होते. डोक्याला तेल नव्हते. तेव्हा मास्तर यांना पाहून जोरात ओरडले 'ए पोरा कुणाचा आहेस तू ?' तेव्हा लेखकाने भीत भीत उत्तर दिले 'मी जोश्याचा हाय' तेव्हा मास्तर खेकसले 'येथे कशाला आला आहेस' तेव्हा लेखकाने आपल्या वडिलांनी आपल्याला पाठविल्याचे सांगताच मास्तर म्हणाले 'तू भिकाऱ्याचा मुलगा तुझं नांव कसं घालायचं शाळेत, जा तुझ्या वडिलांना सांग तुझं नाव शाळत घालता येत नाही, जा पळ'. अशा प्रकारे आपली वेदना ते व्यक्त करतात.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सामान्य माणसाच्या पदरात प्रचंड निराशा पडलेली आहे. स्वातंत्र्य मिळवताना जो उदात्त दृष्टीकोन देशवासीयांच्या मनात होता त्याला पूर्ण हरताळ फासला गेला आहे. तळागाळातील समाजाची अवस्थाही फारशी बदलली नाही. सवर्ण समाज या समाजाचा पूर्वीप्रमाणेच उपभोग्य

वस्तु म्हणूनच वापर करु लागला याचं दु:ख व्यक्त करत असताना लेखक म्हणतात, 'बाजारातील माणसं जास्तीत जास्त आमच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत होती. कारण आम्ही चोरी करु अशी त्यांची समजूत होती. आमच्याकडील बारामिसळीचे धान्य, एखादी दुसरी कोंबडी कोणी घेत नव्हते कारण हे सर्व चोरुन आणलेले असेल म्हणून सारा बाजारच आमच्याकडे हे चोर आहेत या नजरेने पहात होता. म्हणजे आमच्या वस्तूंना बाजारात किंमत नव्हती. आम्ही समाजात गणलो जात नव्हतो. आमची जातच वेगळी होती. जगच वेगळं होतं.'[४]

अशाप्रकारे आपली वेदना ते व्यक्त करतात व आम्ही माणसे आहोत की नाहीत ? आम्हाला मन, भावना आहेत की नाहीत ? इतर समाज आमच्याबरोबर असे का वागतो ? आम्हाला शिक्षणापासून दूर का लोटले जाते ? इ. प्रश्नांचा ते शोध घेतात कारण त्यांची माणूसकी नाकारली आहे. हीच वेदना त्यांना अस्वस्थ करीत आहे. त्यांचा अनुभव दाहक व विदारक आहे. यासाठी त्यांनी 'बाज' गावातील प्रसंग सांगितला आहे. 'बाज' या गावी गबाळ असताना या गावातील पाटलाच्या मुलाचे लग्न चालले होते. आणि कांहीतरी पोटाला गोडधोड मिळेल म्हणून या समाजातील सर्व माणसे या लग्नाच्या ठिकाणी गेली. जवळ जवळ सर्व गावातील मंडळींची पंगत तेथे सुरु होती आणि आशाळभूतपणे जेवण मिळावे म्हणून आमचा समाज त्या पंक्तीकडे पहात होता. तो पाटील या समाजाला हाकलून लावीत होता. आणि हा समाज पुन्हा पुन्हा आशाळभूतपणे पाटलापुढे हात जोडत होता. तेव्हा या समाजातील मारुती मामा पाटलाला म्हणतात, 'तुम्ही नायच म्हणा लागल्यावर काय इलाज हाय का ? पर जरा आमची दया यीव द्या की तुम्हाला.' तेव्हा पाटलाने दोघा तीघांना हाक मारुन खीरीचं पाणी वाढयला लावले. पण ही खीर ताटात पडताच संपवली गेली आणि पुन्हा मागितली गेली. तेव्हा पाटील गुरकावले, 'आता जाता कि न्हाय, आयला जातच तुमची लय आशाखोर, जावा उठा पळा' त्यावेळी या समाजातील लोकांनी बऱ्याच विनवण्या केल्या पण अर्धपोटीच परतावे लागले.[५]

अशा प्रकारे दादासाहेब मोरे यांनी आपली वेदना साकार केली आहे. ही वेदना साकार करताना आपल्या समाजाचे भटके, भणंग, लाचार, व्यसनी, व्याभिचारी जीवन केव्हा संपणार ? सरकारी योजना राबवित असताना आम्हाला का वगळले जाते ? सवर्ण समाज आमचा उपभोग घेणे केव्हा थांबविणार ? माणूसकीचे ज्गिणे आम्ही केव्हा जगणार ? इत्यादी विविध प्रश्न उपस्थित केले आहेत.

**विद्रोह :** महाराष्ट्र ही बंडखोरांची जन्मभूमी आहे, कर्मभूमी आहे. अन्याय, जुलूम याविरुद्ध बंडाचे निशाण उभे करुन सर्वस्व समर्पण करणाऱ्या थोर बंडखोरांची परंपरा या देशात आहे. अन्याय, द्वेष, वर्चस्व, गुलामगिरी, द्रारिद्र्य, पारतंत्र्य, हिंसा इ. कुरुपतेने समाज जीवन जेव्हा काळवंडून जाते तेव्हा बंडाचा झेंडा उभारुन जिकडे तिकडे धामधूम उडवून 'सत्वाचा उदयोस्तु' करावयाची मनिषा महापुरुषाच्या मनात अंकुरते हीच मनिषा उरी बाळगून डॉ. आंबेडकरांनी आपले आयुष्य वेचले. समाजक्रांतीसाठी सर्वस्व पणाला लावणारे डॉ. आंबेडकर हे महापुरुष होते. 'बहुजन हिताय्, बहुजन सुखाय्' हा मंत्र आचरणात आणणारे नवसमाज रचनेचे स्मृतिकार म्हणजे डॉ. आंबेडकर ! या सार्वभौम देशाला 'राज्य घटना' अर्पण करणारे ते भारतीय घटनेचे शिल्पकार आहेत. त्यांनीच ज्ञानाचा दिवा हाती घेवून दलितांना प्रकाश दाखविला. विद्रोहाची ठिणगी पेटविली व विचार हा तलवारीपेक्षाही प्रखर असतो. विचारामुळेच परिवर्तन घडते. त्याशिवाय अज्ञानाची, खुळेपणाची कश्मले जळून जाणार नाहीत. हा विचार मांडून आपल्या वाणीने, लेखणीने त्यांनी मातीतून माणूस निर्माण केला. दलितांना आत्मविश्वास आत्मावलंबन आणि आत्मसन्मानाचा मार्ग दाखविला. मानव जातीच्या इतिहासात त्यांच्या कार्याला जोड नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकर हे विराट मंत्र आहेत. याच मंत्राने दलित साहित्य भारलेले आहे.

दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ' हे आत्मकथन म्हणजे दु:खाची, वेदनेची अभंगगाथा असले तरी अनेक प्रश्न त्यांनी प्रस्थापिताच्या विरोधात उभे केलेले आहेत. न्याय आणि हक्काची त्यांनी मागणी केली आहे. शासकिय अधिकाऱ्याचे, सवर्ण समाजाचे माणूसकीला काळिमा लावणारे वर्तन समाजासमोर ठेवले आहे. स्वातंत्र्याचे गाणे गात असताना विद्रोह सहजगत्या अवतरतो. तेच 'गबाळ' मधील विद्रोहाचे रुप आहे. आपल्या ह्रदयातील विद्रोहाची व्यथा व्यक्त करताना आपल्या समाजाला छोट्या छोट्या गोष्टीसाठी लाचार व्हावे लागते. अपमान सहन करावा लागतो. वर्षानुवर्षे पोटासाठी हिंडावे लागते. सवर्ण समाज या समाजाकडे उपभोग्य वस्तू म्हणूनच पाहतो. हे आता थांबले पाहिजे असे त्यांना वाटते. परंतु आपल्या बळाची त्यांना जाणीव आहे. हे बळ कमी आहे. म्हणून आपला विद्रोह शांत आणि सनदशील मार्गाने त्यांनी व्यक्त केला आहे. या पाठीमागे एक वैचारिक बैठक आहे.

यातील विद्रोहाचे रुप अभ्यासत असताना त्यांनी सांगितलेला पांढूरंग आजोबाचा प्रसंग आपल्या लक्षात येतो. एकेदिवशी गबाळाबरोबर हिंडत असताना पांढूरंग आजोबा रस्त्यातच बेशुद्ध पडले. त्यांना शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न सुरु असताना लेखकाच्या वडिलाने रस्त्याच्या कडेला असणाऱ्या शेतातून गडबडीने पळत पळत जावून कांदा उपडून आणला होता. व आजोबाच्या नाकाला तो लावण्यास

सुरुवात झाली. तितक्यात एक शेतकरी हातात चाबुक धरुन पळत आला व एक जोरदार चाबूक त्यांच्या समाजातील सुभाषच्या पाठीवर मारला तेव्हा सुभाष 'अगं आय, मेलो !' म्हणून विव्हळत पडला तेव्हा तो शेतकरी मुसमुसत 'आता माझ्या शेतातनं कोण पळत आलयां ? म्या माझ्या डोळ्यानं बघितलाय' असे म्हणू लागला. तेव्हा लेखकाचे वडिल व्याकुळ स्वरात म्हणाले, 'मालक, म्याच आलु व्हतु, आवं आमचा एक म्हातारा मरायला लागला होता, सुदीतच नव्हता, म्हणून कांदा आणलायां', अशा प्रकारे बोलत होते. तेव्हा लेखक म्हणतात तेव्हा माझ्या काळजाच्या चिंधड्या होत होत्या. मला काहीच करता येत नव्हते. काहीतरी बोललो असतो तर चाबकाचे चार फटके बसले असते, उलट आमच्याच लोकांनी मला मारलं असतं. म्हणून गप्प बसलो. तेवढ्यात त्या शेतकऱ्याच्या घरातील काही माणसे पळत आली. मला वाटलं वडिलांना आता मारतात. मी रडायला लागलो. आई पळत जावून त्या शेतकऱ्याच्या पायावर पडली. रडत रडत म्हणू लागली, 'मालक, आमच्यावर यवढी दया दाखवा.... त्यंनास्नी सोडा.... मी तुमच्या पाया पडते.'[६]

अशाप्रकारे आपल्या मनातील विद्रोहाची भावना व्यक्त करताना आपल्या समाजातील लाचार, भिकार, शिळ्या भाकरीच्या तुकड्यावर समाधान मानणाऱ्या अल्पसंतुष्ट प्रवृत्तीविषयी ते तिरस्कार व्यक्त करतात. कारण ज्या जीवनात मनुष्य हीन पदाला पोहोचतो. तेच जीवन आपला समाज पुन्हा पुन्हा कवटाळतो यासाठी त्यांना प्रचंड राग आहे. त्यातुनच त्यांची विद्रोही प्रवृत्ती जागी झालेली आहे. लेखकाला तर लहानपणीच थाटली हातात घेवून मागायला पाठवले त्यावेळी अनेकांनी अनेक शिव्या दिल्या. कुळीमुळीचा उद्धार केला परंतु, दररोज असे जीवन जगणाऱ्याविषयी त्यांना चीड आणि संताप आहे. त्यातुनच त्यांचा विद्रोह जागा झाला आहे. त्यांच्या जीवनातील अशाच एका प्रसंगाचे वर्णन ते करतात. एकेदिवशी ते आईच्या सांगण्यावरुन मागायला जातात. मागून येत असताना त्यांच्याच जातीतील गंगूमावशीचा म्हवऱ्याही येत होता. "तो पळत पळत माझ्यापर्यंत आला. मला म्हाणाला 'तुला भाकऱ्या किती मिळाल्या रं?' मी माझं ताट त्याला दाखवलं त्यामध्ये जेमतेम तीन चार भाकरीचे तुकडे होते. त्याच्या ताटात मात्र बरेच तुकडे होते. आम्ही पालावर आलो. आईनं माझ्या हातातील ताट घेतले आणि त्यामधून भाकरीचे तुकडे काढून मोठ्या अभिमानाने खावू लागली. स्वत:शीच म्हणू लागली, 'आता माझा बाळ मिळवा लागला' पंधरादिवसा पूर्वी घेतलेली शाळेची पाटी काढली. पाटीकडे पाहून नकळत आसवाचे दोन थेंब टपकले. एका मागून एक आले होते. त्यांना माझं कौतुक वाटत होतं. पाखराच्या पिलाला उडता येवू लागलं की आनंद होणारच पण मी मात्र आतल्या आत जळत होतो. सकाळपासून कितीतरी शिव्या खाल्ल्या होत्या. अनेक शब्द बोचत होते. माझ्या बालमनाला न पेलणारे शब्द मला एकसारखे अस्वस्थ करीत होते."[७]

यानंतर दादासाहेब मोरे यांनी आपल्या समाजातील वेगवेगळ्या प्रथा पद्धतीवर नाराजी, विद्रोहाची भावना व्यक्त केलीच आहे. पण त्याबरोबर हिंदू संस्कृती, सवर्ण समाज आमच्याकडे पूर्वापार कशा विकृत नजरेने पाहतो आहे. आम्हाला माणूस मानायलाच हा समाज तयार नाही. आमच्या समाजाला फक्त उपभोग्य वस्तू म्हणूनच तो समाज पाहतो आहे. याबद्दलचा विचार मांडताना ते म्हणतात. 'मानवतेचे गोडवे गाणाऱ्या या संस्कृतित मनुष्य मात्र उपाशी आहे.' याची जाणीव करुन देऊन शेगाव या गावातील प्रसंग ते सांगतात. 'या गावी त्यांच्या समाजातील माणसे भल्या पहाटेच मागायला गेली होती. पण बहुतेक सर्व लोक सण संध्याकाळीच करीत असल्यामुळे आम्हाला पोळ्या मिळणे अशक्य होते. भारतीय संस्कृतीने होळीच्या सणाची प्रथा चालवली होती. ती आम्हाला शापास्पद होती. सकाळी सण केला असता तर आम्हाला चार पोळ्या मिळाल्या असत्या. पण संध्याकाळी सण केल्यामुळे आम्हाला काहीच मिळाले नाही. पोळ्या मिळतील म्हणून माणसे दिवसभर मागत होती. तरीपण सण कोणी लवकर केला नसल्यामुळे सर्वजण निराशेने परतली होती. आम्ही मागून आलो भाकरीचे तुकडेच मिळाले होते.'[८]

वरीलप्रमाणेच लेखकाने सवर्ण समाजाविषयी विद्रोहाची भावना व्यक्त केलेली आहे. ही भावना व्यक्त करताना ते वर्णन करतात, 'सखाराम दोरकराची मुलगी वयात आली होती आम्ही कोळगिरीला राहिलो होतो. दुकानातून काही आणण्यासाठी आम्ही बरीच मुलं गावात गेलो होतो. दुकानातून कोणी चहा पावडर घेतली. कोणी गुळ तेल घेतले तर, कोणी आगपेटी, मीठ घेतले. अशा किरकोळ गोष्टींची खरेदी करुन आम्ही पालाकडे येऊ लागलो. गावातील मारुतीच्या देवळासमोर काही मुलं बसली होती. मुलं तरुण होती. रत्ना देखील आमच्याबरोबर दुकानाला आली होती. रत्नाला पाहून एक मुलगा म्हणला, 'आयला काय कांडकं हाय' लगेच दुसरा मुलगा म्हणत होता, 'आरं ती भिकाऱ्याची पुरगी हाय' लगेच पहिला मुलगा म्हणत होता, 'आरं येड्यां कुणाचीका असनां, आपणाला काय लगीन करायचं हाय.... कामापुरती झाली म्हणजे झालं' एवढे बोलून सर्वजण मोठ मोठ्यानं हसू लागले. त्यांच्या विषारी नजरा रत्नावरच खिळल्या होत्या. त्या नजरेने रत्नाच्या काळजाचे पाणी पाणी केले होते. मला त्या मुलाचा भयंकर राग आला होता. पण आम्ही काहीच करु शकत नव्हतो.'[९]

अशाप्रकारे आपल्या समाजाचे हतबलता ते वर्णन करतात अर्थात ही हतबलता सबंध दीन-दलित भटक्या, भिकार, भणंग, लाचार समाजाची हतबलता आहे. प्रातिनिधीकत्वाच्या रुपाने ती येथे साकार झाली आहे. तोंड बंद करुन हा समाज बुक्क्याचा मार सहन करतो आहे. सवर्ण समाज, संस्कृती तो देत आलेली आहे. व हा आपला अधिकारच आहे. हा समज सवर्ण वर्णियांनी करुन घेतला

आहे. व आतातरी हा अन्याय अत्याचार, बलात्कार आम्ही सहन करणार नाही. कारण

> 'दिसेल तिथे अंधार, पेटवून उठू आम्ही,
> दिसेल तिथे अन्याय, तुटून पडू आम्ही'

ही जीवनमुल्ये आम्ही आता प्रमाण मानली आहे. कारण आजपर्यंत आम्ही खुप सोसले आहे. आम्हाला गुलाम बनविले आहे. मंदिर प्रवेश नाकारला आहे. पाणवठे बंद आहेत. म्हणून हा विद्रोह जन्माला आला आहे. दादासाहेब मोरे ही आपला विद्रोह व्यक्त करतात पण त्याची धार बोथट आणि संथ आहे. आपा विद्रोह व्यक्त करताना ते कोठेही कटू आणि अश्लील शब्द वापरीत नाहीत, तर समंजस आणि गंभीर होवून आपला विद्रोह समाजासमोर मांडला आहे. त्यांच्या विद्रोहाची जात कुळी बघताना त्यांनी सांगितलेल्या मंगसुळी गावातील मारुती मंदिरातील प्रसंग आपल्या नजरेसमोर येतो. जत मध्ये शिकत असताना मानकाईने जेवण बंद केल्यानंतर आपल्या आईवडिलाच्या शोधार्थ ते वणवण भटकतात व मंगसुळी गावी येतात. रात्र झाल्यानंतर ते देवळात झोपतात. ''तेव्हा पुजारी आले व म्हणाले , 'कोण हाय ?' मला समजलं की सारा गांव मराठी बोलत असावा. माझी भिती कमी झाली. मी सांगितले, 'मी जोश्याचा हाय, आमची लोकं पुढ गेलीत, त्यांना शोधतोय' पुजारी एकदम खवळले, 'जोश्याचा हायस.... अन् मारुतीच्या देवळात झोपलायास लाज वाटत नाय, चल उठ.... हूं मोठा शहाणाच दिसतुयास' मी देवळातून उठलो. बाहेर कट्टयावर आलो अन् गप्प पडून राहिलो. झोपेचे नांव नव्हते, गप्प पडून राहिलो. देवळात जोश्याने झोपले म्हणजे काय होते ते मला समजेना. मनातल्या मनात देवालाच दोष देत होतो. का म्हणून या जातीत जन्माला घातले आहेस. त्यापेक्षा कुत्र्याच्या जन्माला घातले असतेस तर बरे झाले असते.''[१०]

सवर्ण समाजाच्या या अनुभवाप्रमाणेच आणखी एक अनुभव त्यांनी वर्णन केलेला आहे. त्यातून या समाजाला

> 'आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना'

या प्रसंगाला सामारे जावे लागते. जतनधे शिक्षण घेत असताना इतर समाजाकडून जी भयानक वागणूक मिळाली. त्याबद्दल त्यांच्या मनात राग आहे. जतमध्ये गिर्मल अण्णाच्या मदतीने आपण शिक्षण घेतले. तेव्हा गटारी साफ करण्याचे काम करीत होतो. त्यावेळी शिवाजी नगरमध्ये राम आणि लेखक गटारी साफ करीत असताना राम म्हणला, 'तु तिकडच्या बाजूनं घाण काढीत ये, मी हिकडच्या बाजूने येतो.' मी गटारीच्या दुसऱ्या टोकाला गेलो. गटारीत खोरे ढकलीत बाहेर काढले. घाणीचा भपका नाकात गेला. घाण वास सहन

होईना. उलट्या होतात की काय असे वाटू लागले. पोटात उचंबळून येत होते. मनात विचार येत होता, असले जीवन जगण्यापेक्षा मरण आलेले फार चांगले. पण गरीब लोकांना मरण देखील येत नसते. अनेक धोक्यातून संकटातून जगतात. लाचारीत आपले जीवन जगत असतात. मी डोळे झाकून खोरे बाहेर काढीत होतो. घाण गटारीच्या दोन्ही बाजूला बाहेरच्या बाजूला लावीत होतो. ज्याच्या दारासमोर गटारे होती ते लोक म्हणत होते, 'जरा लांब लाव की घाण.... बरं आलाय, गटार साफ करायला' मी गप्प ऐकून घेत होतो. माझ्या जीवनाचा मला तिरस्कार आला होता. असले जीवन किती दिवस जगणार होतो ? पण मला माहित नव्हते. हे सत्य होते की, आमची जमात सुधारणार नाही, गावोगाव भटकत राहणार होती.[११]

या आत्मकथनातील वेदना आणि विद्रोहाचा विचार करीत असताना समाजाच्या भयावह स्थितीला कारणीभूत असणाऱ्या वेगवेगळ्या घटकासंबंधीचे वर्णन लेखक करतात. त्यामध्ये आपल्या जातीत असणारे अंधश्रद्धा, रुढी परंपरा, हिंदू संस्कृती व या संस्कृतीचा विचित्र दृष्टीकोण इ. विषयी लेखकाने चिंतन केलेले आहे. याबरोबरच शासनाच्या निरनिराळ्या योजना व त्या स्वत:साठीच राबविणारे अधिकारी, धन दांडगे होतात. पण ज्याच्यासाठी योजना आहे तो मात्र भणंग, भिकारीच राहतो. हा महत्त्वाचा मुद्दा येथे उपस्थित केला आहे. १९७३-७४ च्या दुष्काळात माणकाई बरोबर रोजगार हमीच्या कामावर जात असतानाचा प्रसंग त्यांनी वर्णन केलेला आहे. ते म्हणतात, 'लोक बाजार करण्यास जाणार असल्याने दर सोमवारी दुपारपर्यंतच काम असायचे. दुपारी बारा वाजता काम संपले. त्यानंतर सर्वजण ओळीने उभे राहिलो, ज्याचे नांव पुकारले जाईल. तो पुढे जात असे. कोणाला जमत असेल तो सही करीत होता. तर कोणी अंगठे उठवीत होते. देतील ते पैसे घेऊन परत येत होते. माझा नंबर आला मी गेलो सही केली. फक्त सहा रुपयेच आठवड्याचा पगार मिळाला. मी विचारले, 'साहेब, सहा रुपयेच कसे ?' साहेब म्हणाले, 'तु लहान आहेस म्हणून तुला अर्धा पगार दिला आहे.' मी गप्प बसलो. काम करतेवेळी इतर मोठ्या माणसांबरोबर पाट्या भरून देत होते. आणि पगार देतेवेळी मी लहान होत होतो. मला राग येत होता. पण नाईलाज होता. दुसऱ्यादिवशी कामाला यावे लागणार होते. म्हणून काही बोलू शकत नव्हतो.''[१२]

'गबाळ' मधील वेदना व विद्रोहाचे रुप लक्षात घेतल्यानंतर या साहित्य रुपाची जाणवणारी ठळक वैशिष्ट्ये नोंदविणे आवश्यक ठरते. ही वैशिष्ट्ये आत्मकथनाच्या अध्ययनातून प्रतित होतात. अर्थात लेखनापूर्वी ही वैशिष्ट्ये ठरवून लेखकाने लेखन केलेले नाही. तर आत्मकथनाच्या एकूण अभ्यासानंतर ती प्रतित होतात.

१) **कृतज्ञता :** दादासाहेब मोरे यांनी या लेखनातून आपल्या शैक्षणिक प्रगतीचा, सुखदु:खाचा खडतर वाटचालीचा आलेख तर मांडलाच आहे. त्याबरोबरच आपल्या समाजाची व्यथा, वेदना, लाचारी, दारिद्य, शिक्षणाचा असणारा अभाव इ.चे वर्णन केले आहे. आपली व्यथा, वेदना, विद्रोह वेशीवर टांगला आहे.( पण आपल्या जीवनाच्या वाटचालीत वेळोवेळी आपल्यासमोर संकटे उभी राहिली. त्या संकटात मदत करणाऱ्या माणसाविषयी अनन्य साधारण असा कृतज्ञता भाव व्यक्त केला आहे.)

सर्वप्रथम ते शाळेला गेल्यानंतर सलगरे गावातील शिक्षकांनी त्यांना शाळेच्या पटांगणातच बसविले होते. पण बावची गावच्या हरि केशव लाड गुरुजींनी मात्र अगदी आस्थेने विचारपूस करुन शाळेत जवळ बसवून घेतले. लेखकाने केलेल्या अभ्यासाचे कौतुक केले. वेळोवेळी मार्गदर्शन आणि सल्ला दिला. परीक्षेच्या वेळी पेनच्या रुपाने मदत केली. अशा या गुरुजीचे वर्णन ते कृतज्ञतेने करतात. याबरोबरच निंबोणीच्या शाळेतील पाटील गुरुजींनी त्यांना पाचवीची पुस्तके घेऊन दिली होती. त्यांच्याविषयी अशीच कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली आहे. यानंतर माणकाईने छोट्या छोट्या वस्तूंचा व्यापार करुन प्रसंगी रोजगार हमी योजनेवर काम करुन जतला जेवणाचा डबा पाठविला. नागू आज्याने देखील पैशाच्या रुपाने वेळोवेळी मदत केलेली आहे. त्यांच्याविषयी कृतज्ञता भाव व्यक्त झाला आहे. रोजगार हमी योजना बंद पडली. माणकाई उपाशी मरु लागली. तिने लेखकाचे जेवण बंद केले. तेव्हा आईवडिलांच्या शोधार्थ लेखक भटकू लागले. तेव्हा अथणी गावी एका गाय पारध्याने त्यांना जेवण दिले. दोन चार दिवस उपाशी असणाऱ्या लेखकाच्या अंगात चैतन्य आले. तेव्हा लेखक त्या वृद्ध गाय पारध्याचे आभार मानताना म्हणतात, 'बाबा तुमचे फार उपकार झालेत, माझ्यावर.... दोन दिवसाचा उपाशी होतो, मी आता निघतो.... कुठेतरी बिऱ्हाड सापडतं का बघतो'[१३]

लेखक जतमध्ये शिक्षण घेत असताना बाळू कांबळे व त्याच्या आईने त्याचप्रमाणे हरिष मालाणीने ही मदत केली. गिर्मल अण्णांनीही काम मिळवून दिले. रामराव हायस्कूलच्या मुख्याध्यापकांनी ही पुस्तक आणि वहीच्या रुपाने मदत केली. त्या सर्वांविषयी किंवा पुढे सांगलीचे नातूसर, असनारे सर, सौ. कुलकर्णी व इतर नातेवाईक यांनी या ना त्या रुपानी जी मदत केली त्या सर्वांविषयी लेखकाने कृतज्ञताभाव व्यक्त केला आहे.

२) **अस्मितेचा शोध :** या आत्मकथनाची अत्यंत महत्त्वाची वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने आपल्या अस्मितेचा शोध यातून घेतला आहे. कारण मनोगतात ते म्हणतात, '' माझ्या 'गबाळ' या आत्मकथनात

मी जे आजपर्यंत अनुभवले, पाहिले आणि आजदेखील जगतो आहे, उपभोगतो आहे त्याचे वास्तव चित्रण केले आहे. या पुस्तकातील प्रत्येक पात्र सत्य परिस्थितीत तोंड देत आहे. समाजातील एक घटक की ज्याला स्वत:चे अस्तित्व नाही. अशा घटकाचे म्हणजे 'कुडमुडे जोशी' या जातीचे जीवन विस्तारीत स्वरुपात वर्णन केले आहे. भटक्या जमातीचे दु:ख, त्यांच्या व्यथा, वेदना, स्त्रियांचे पशुतुल्य जीवन, त्यांच्या रुढी परंपरा, चालीरिती, अंधश्रद्धा, अशिक्षितपणा याविषयीचा सत्यवृत्तांत मी आपणासमोर सादर केला आहे.''[१४]

लेखकाने या लेखनातून आपला समाज अशाप्रकारचे भटके, लाचारीचे, दारिद्र्याचे, इतर समूहापासून दूरचे जीवन किती दिवस जगणार आहे ? परमेश्वराने मला या जातीत जन्माला का घातले ? ज्या संस्कृतीत पशूचे पोट भरते. त्या संस्कृतीत माणसाला उकीरड्यावर बसवून जेवण घ्यावे लागते. माणसासारख्या माणसाला पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. देव सर्वांचा आहे अशी स्तोत्रे गाणाऱ्या या संस्कृतीत माणसाला मात्र देवळात झोपू दिले जात नाहीत. शाळेत पटांगणात बसावे लागते. जेथे गांधीजींची, नेहरुंची पूजा होते. तेथेच कष्ट करुन, काम करुन खाणाऱ्याला मात्र तिरस्कृत नजरेने पाहिले जाते असे का ? ही कोणती संस्कृती ? हे सर्व थांबणार केव्हा ? या भटक्या जमाती सुधारणार केव्हा ? माणसाला माणूसकी केव्हा मिळणार ? या सर्व प्रश्नचिन्हांचा शोध या लेखनातून घेतला आहे. अर्थात त्याला उत्तरही मिळाले नाही. हे एक सत्य आहे.

३) **सार्थ आणि सर्मपक शिर्षक** : भारतात काहींच्या वाट्याला दलितत्त्व आले आहे. ते जाती विषमतेमुळे व काहीच्या वाट्याला आले आहे ते आर्थिक विपन्नतेमुळे. पोटासाठी भटकणाऱ्या कितीतरी जमाती महाराष्ट्रात आहेत. महार, चांभार, मांग, परधान अशा जातींना निदान ग्रामजीवनात बलुतेदारी तरी आहे. त्यांना वस्त्या गावठाणे आहेत. पण या भटक्या जमातींना स्वत:चे गावकुसही नाही. या जातींना हिंडण्याची परंपरा आहे. त्यावेळी गांव त्यांना गावच्या हागणदारीत जागा देतो. नाममात्र उद्योग व रोज एक गांव भीक मागून पुढे चालू लागायचे. या वाटेतच जन्म, बारसे, मर्तिक उरकायचे. पोटासाठी दु:ख करायलाही वेळ नाही.

स्त्रियाही स्वयपाक करणे लीद शेण गोळा करणे, पाल मांडणे, गोळा करणे, घोडी राखणे, जळण आणणे, दरवर्षी एका मुलाला जन्म देत गबाळाबरोबर भटकत हिंडतात. इतर कोणत्याही समाजाचा जवळून परीचय नाही. उदरनिर्वाहाचा निश्चित मार्ग नाही. आर्थिक पाठबळ नाही. रुढी, परंपरा, अंधश्रद्धा टाकून देऊन औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभाग नाही. अशा दुष्ट चक्राच्या

आवर्तात हा समाज पिढ्या न् पिढ्या सापडला आहे. 'तो दु:खाचे ओझे घेऊनच जीवन जगत आहे.' या वर्णनाला सार्थ असणारे नांव लेखकाने या आत्मकथनाला दिली आहे. ते सार्थ आहे.

४) **परिवर्तनाकडे वाटचाल** : वर वर पाहता सर्वच आत्मकथनकारांनी आपल्या दु:खगाथांची चित्रण करण्यासाठी हे लेखन केल्याचे म्हटले असले तरी या लेखनामागचे खरे दोन हेतू आपणाला दिसून येतात.

१. आपल्या अस्मितेचा शोध घेणे, आपल्या अस्तित्त्वाचा अर्थ समजून घेणे व समाज व्यवस्थेत आपले व आपल्या जातीचे स्थान निर्माण करणे.

२. याबरोबरच समाज व्यवस्थेत बद्ध असणारी समाज व्यवस्था बदलली पाहिजे. आपल्या व आपल्या समाजाच्या वाट्याला आलेली आर्थिक दारिद्य्र व सामाजिक कुचंबणा संपली पाहिजे. या भुमिकेतून हे लेखन केल्याचे दिसते. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सामाजिक शवचिकित्सा करण्याचा या लेखनामागील हेतू आहे.

गबाळ या आत्मकथनातून देखील हेच दृष्य आपल्या नजरेसमोर येते. असे जीवन आमचा समाज कुठपर्यंत जगणार ? आम्ही माणसे आहोत की नाही ? आमचा समाज असे का वागतो ? इतर समाजातील माणसांना प्रतिप्रश्न का विचारला जात नाही ? इ. प्रश्न या आत्मकथनातून लेखकाने मांडलेले आहेत. या प्रश्नाबरोबरच परिवर्तनाकडे सुरु असणारी वाटचाल आपल्या लक्षात येते. कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले आहे. म्हणूनच मल्हारी मोरे आठवड्याचा बाजार न करता पाटी पुस्तके घेतात. माणकाई रोजगार हमीच्या कामावर जाऊन दादासाहेबाला जेवण पाठविते. येदू तात्या भीक मागून दामूला शिकवितात. लेखक स्वत: गटारी साफ करतो. गोंधळेवाडीचे जयवंत मोरे, सांगलीला पोलीस आहेत. स्वत: लेखकही विविध नाट्यसंस्थातून कामे करुन पैसे मिळवितो. कुटूंब नियोजनासारख्या सामाजिक सुधारणेकडे या समाजाचे लक्ष गेले आहे. अशाप्रकारे हा समाज वर्षा नु वर्ष अंधारात रहात असला तरी या समाजाला आता प्रकाशाची ओढ लागलेली आहे. त्यासाठी परिवर्तनाकडे त्यांची वाटचाल सुरु आहे.

५) **व्यक्तिचित्रणातून समाज दर्शन** : या आत्मकथनातून दु:ख, दैन्य, दाश्य, दारिद्य्र, भिकार, भणंग, लाचार जीवन आलेले असले तरी प्रभावी अशी व्यक्तिचित्रणे रेखाटलेली आहेत व समाज दर्शन घडविलेले आहे. या समाजातील स्वत: लेखकाचे वडील फाटके कपडे घालतात. पहाटे पहाटे उठून

भीक मागायला जातात. कठीण प्रसंगी नम्रता धारण करुन वेळ निभावून नेतात. त्यांची आई वणवण भटकते, कुटुंबासाठी राबते. दादासाहेबाच्या शिक्षणासाठी पैसे कमी पडत असताना कोणाकडून तरी व्याजाने काढून आणण्याचा सल्ला ती देते व 'ही दिस काय असंच ऱ्हात्याती....? जात्या लीगी कवातर.... आता पतुर त्यानं हाल खावून शिकलयं ते काय मातीत घालाया ?' असा आशावादी विचार ती व्यक्त करते. नागू आजोबा इतर विऱ्हाडातील व्यक्तिंना कठीण प्रसंगी पैसे देतात. मानकाई रोजगार हमी योजनेवर जाऊन लेखकाला जेवण पाठविते. या समाजातील वामन शिंदे देखील कठीण प्रसंगात लेखकाला जेवण देतात, आर्थिक मदत करतात. लेखकाची आजी अत्यंत धार्मिक व विठ्ठलाची भक्त असल्याचे दिसते.

अशाप्रकारे वेगवेगळी व्यक्तिचित्र आपल्या समोर येतात. ही सर्व व्यक्तिचित्रे गरीबीने, लाचारीने, दारिद्र्याने, भणंग आणि भिकार बनलेली आहेत. पण मनाने मात्र ती खूप श्रीमंत आहेत. माणूसकी आणि मानवता आहे. 'ऱ्हा न्याय पोरा ऊ उपकार कसलं...., मा माणसानं माणसाच्या येळंला व्हु व्हुयाचं न्हाय तर माणुस कसलं'[१५] हे त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. प्रत्येक संकटात सर्वजण एकत्र राहतात. आनंदाच्या क्षणी आनंद उप्भोगतात. दुःखाच्या क्षणी सामुहिकतेने त्याचा स्विकार करतात. कुणी शिव्या दिल्या तर त्याचा राग व्यक्त न करता पुढच्या दाराला चालू लागतात. आणि कुणी अर्धी भाकरी दिली की तोंड भरुन आशिर्वाद देतात.

अशाप्रकारे या सर्व व्यक्तीचित्राच्या परिचयातून आपणाला एका प्रगल्भ , समंजस जीवनाचा परीचय आपणाला होतो.

'गबाळ' मधील वेदना आणि विद्रोहाचे स्वरुप अभ्यासानंतर आपल्या लक्षात येते ती गोष्ट म्हणजे आजपर्यंतच्या आत्मकथनातून वेदना व विद्रोहाचा सुड मानला गेला. परिवर्तनाकडे वाटचाल करताना

'तुझे रक्त, माझे रक्त एका बॉयलरमध्ये ओतूया,
अणुस्फोटाचाही झाला नसेल असा प्रचंड स्फोट करुया,
दलितांची सत्ता साऱ्या जगावरती स्थापू या'[१६]

असा हुकूमशाहीशी सोयरीक करणारा विचार व्यक्त केला जातो. पण गबाळमध्ये मात्र हे कांहीच नाही. (एका शांत समंजस सारासार विवेकबुद्धीने हे लेखन झाल्याचे दिसते.) म्हणून प्र. ई. चे 'आठवणीचे पक्षी', दया पवारांचे 'बलुतं', माधव कोंडविलकरांचे 'मु. पो. देवाचे गोठणे' या आत्मकथनाशी व शंकरराव खरातांच्या 'तराळ अंतराळ' या आत्मचरित्राशी जवळीकता गबाळने साधलेली आहे. आपल्या वेदना आणि विद्रोहाचे

चित्रण करताना आपल्या दु:खी कष्टी जीवनात ज्यांनी मदत केली त्यांच्याविषयी कृतज्ञतेने भारुन लेखकाने उल्लेख केला आहे. हे या लेखनाचे यश आहे. समर्पक शिर्षक देऊन वाचकांना आकर्षित केले आहे. अत्यंत मोजक्या शब्दांने आपल्या समाजातील विविध व्यक्तिमत्त्वांचा परिचय वाचकांना करुन दिला आहे.

या आत्मकथनाचा अभ्यास केल्यानंतर यातील काही मर्यादांचाही विचार करावा लागतो. त्यापैकी लक्षात येणारी मर्यादा म्हणजे या समाजाचा गावोगावचा जो प्रवासवर्णन केलेला आहे त्यात एकसंघता नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या एकाही घडामोडीचा इतिहास नाही. फक्त शिक्षण आणि समाज जीवनाची भटकंती इत्यादी संबंधीचेच लेखन केले आहे.

असे असले तरी या लेखनातून एका प्रगल्भ वैचारिक बैठक असणाऱ्या व्यक्तिचा, समाज जीवनापासून, नागरी जीवनापासून रानावनात काळोखात दिवस काढणाऱ्या समाजाचा परिचय होतो. एका भटक्या समाजाच्या जीवनचित्रणातून मराठी साहित्याला एका आगळ्या वेगळ्या संस्कृतीची ओळख झाली आहे.

# संदर्भ टिपा


१) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके, २५०, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती १९७७, पृ. २५.

२) गबाळ - दादासाहेब मोरे, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती १९८३, पृ.३.

३) उनि - पृ. ४.

४) उनि - पृ. ७.

५) उनि - पृ. ३७.

६) उनि - पृ. ११.

७) उनि - पृ. १८.

८) उनि - पृ. ५७.

९) उनि - पृ. १०६.

१०) उनि - पृ. १३८.

११) उनि - पृ. १६२.

१२) उनि - पृ. १११.

१३) उनि - पृ. १३८.

१४) उनि - मनोगत, पृ. २.

१५) उनि - पृ. १३८.

१६) ऑडिट - प्रल्हाद चेंदवणकर.